अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Displayed on- 08/10/2018 11 OCT 2018 Notice No. 156

## फक्त वरिष्ठ विभागांकरिता

## स्कॉलरशिप / फ्रिशिपबाबत

## अत्यंत महत्वाची सूचना

शै.वर्ष २०१८–१९ चे जातसंवर्गातील म्हणजेच एस.सी., एस.टी., एन.टी., ओ.बी.सी.,व एस.बी.सी. (फक्त वरिष्ठ विभाग) ऑनलाईन स्कॉलरशिप / फ्रिशिपचे फॉर्म भरणेकरिता वेबसाईट चालू झालेली आहे. वेबसाईट खालीलप्रमाणे आहे.

**Website - mahadbt mahait.gov.in**

सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे.

१. विद्यार्थ्यांचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.
२. शै.वर्ष २०१७–१८ मा.तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला.
३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स.
४. १० वी, १२ वी व त्यापुढील मार्कशिट.
५. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
६. आधारकार्ड झेरॉक्स.
७. आधारकार्ड, बँकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक व सोबत पावती जोडणे.
८. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.
९. डोमासाईल सर्टिफिकेट.
१०. स्वत: चे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेले बँकपासबुक. ( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)
११. रेशनकार्ड झेरॉक्स.
१२. प्रवेश चलन झेरॉक्स.

Scanned by CamScanner

१३. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप व फ्रिशिपचे फार्म भरताना त्यांच्या खालील योजनेतून फॉर्म भरावेत.

१. एस.सी. प्रवर्ग — Social Justice & Special Assistance Department.
२. एस.टी. प्रवर्ग — Tribal Development Department.
३. व्हीजेएनटी, ओ.बी.सी व एस.बी.सी. प्रवर्ग — VJNT, OBC, & SBC Welfare Department

जातसंवर्गानुसार विद्यार्थ्यांनी प्रवर्गानुसार योजना निवडावी व त्यानुसार ऑनलाईन स्कॉलरशिप/ फ्रिशिपचा फॉर्म भरावा.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप किंवा फ्रिशिपचा फार्म भरल्यानंतर ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक असणारी कागदपत्रे जोडून प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागाच्या खिडकीवर जमा करावा. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश फी सवलतीत झालेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेची नि:शुल्क सुविधा आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सायबर कॅफे मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी या सुविधेचा जास्तीत जास्त वापर करावा.**

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

Scanned by CamScanner